www.janatabankpune.com

# गरुड झेप

सन २०१६ – अंक ३ रा सप्टेंबर २०१६ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून

बँकेची सर्वसाधारण सभा दि. २७ जून, २०१६ रोजी बालगंधर्व रंगमंदिर, शिवाजीनगर, पुणे येथे संपन्न झाली. दि. ९ व १० जुलै २०१६ बँकेच्या शाखांच्या कामगिरीचा पहिला त्रैमासिक आढावा कॉन्फरसिंगद्वारे मुख्यकचेरीत घेण्यात आला आणि त्यानंतर दि. १६ जुलै, २०१६ रोजी शाखाव्यवस्थापकांची बैठक पी.वाय.सी. सभागृहात आयोजित करण्यात आली. या तिन्ही बैठकांमध्ये बँकेच्या कामगिरीवर सविस्तर चर्चा झाली. भांडवल पर्याप्तता, ठेवीच्या मिश्रणातील उपयुक्त बदल, प्रति कर्मचारी व्यवसाय, बँकेची निव्वळ ऐपत या आपल्या जमेच्या बाजू. समाधानकारक कामगिरी नसलेल्या जागा या बैठकांत अधोरेखित केल्या गेल्या आणि त्यांना सुधारण्यासाठी यथोचित उपाय योजना कार्यान्वित करण्यात आली. मुख्य कचेरीतून प्राप्त परिपत्रकाद्वारे या उपाय योजना एव्हाना आपणापर्यंत पोहोचल्या असतीलच.

दि. ३१/०३/२०१६ रोजी संपन्न आर्थिक वर्षात बँकेच्या व्यवसायवृद्धीचा वेग यापूर्वीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेने किंचित मंदावल्यासारखा दिसतो. राष्ट्रीय स्तरावर बँक व्यवसायाच्या वृद्धीसाठी हवे तेवढे पोषक वातावरण नव्हते हे देखील त्याला कारण असू शकेल. बँकेच्या ठेवी गतवर्षाच्या तुलनेने ८.६०% आणि कर्जे ७.९०% एवढी वाढली. बँकेचा निव्वळ नफा साधारण कायम राहिला. बँकेच्या कामगिरीच्या मूल्यांकनात या तिन्ही घटकांना विशेष स्थान आहे. चालू आर्थिक वर्षाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी त्यामुळे जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

बँकेच्या अनुत्पादक मालमत्तेमध्ये वाढ झाली आहे ही बाब गंभीर आहे. थकीत कर्जाच्या वसुलीसाठी सर्व स्तरांवर प्रभावी प्रयत्न करून अनुत्पादक कर्जांचे प्रमाण नियंत्रणात आणणे आपली प्राथमिकता आहे. शाखेत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातूनच हे शक्य आहे. त्याच बरोबर मालमत्तेच्या गुणवत्तेसाठी यापुढे कर्जप्रकरणाची पारख करूनच निर्णय घेणे देखील तेवढेच गरजेचे आहे. निव्वळ मालमत्ता प्रमाणात राखण्यासाठी अनुत्पादक कर्जावरील तरतूद गतवर्षी वाढवावी लागली त्याचा परिणाम बँकेच्या निव्वळ नफ्यावर झाला, याची पुनरावृत्ती होता कामा नये. दि. ३१/०३/२०१६ रोजी संपन्न आर्थिक वर्षात दोन उत्साहवर्धक घटना घडल्या. बँकेच्या ठेवीच्या

➤ पान क्र. २ वर ...

## चौंडेश्वरी सहकारी बँक इचलकरंजीचा जनता बँकेत विलीनीकरण समारंभ




आर्थिकदृष्ट्या सधन असणाऱ्या ठेवीदारांकडून बँकांनी दीर्घमुदतीसाठी विनाव्याज ठेवी घ्यावात आणि या रकमेतून आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना विनाव्याज कर्जपुरवठा करावा. यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटण्यास हातभार लागेल, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री आणि पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज येथे केले. याचवेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडापटू तयार होण्यासाठी बँकांनी स्पोर्ट्स लोन ही संकल्पना राबवावी, असे आवाहन बँकांना केले.

**शेतकऱ्यांना बँकांनी विनाव्याज कर्जपुरवठा करावा – महसूलमंत्री चंद्रकांतदादा पाटील**

आपल्या बँकेमध्ये चौंडेश्वरी सहकारी बँक इचलकरंजीचा विलीनीकरण समारंभ दिनांक २७ ऑगस्ट २०१६ रोजी इचलकरंजी येथील श्रीमंत नारायणराव बा. घोरपडे नाट्यगृहात संपन्न झाला. या प्रसंगी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील बोलत होते. समारंभाला सहकारमंत्री श्री. सुभाष देशमुख, आ. सुरेश हाळवणकर, नगराध्यक्षा सौ. शुभांगी बिरंजे, सहकारतपस्वी बापुसाहेब पूजारी, मा. जिल्हा संघचालक भगतरामजी छाबडा, सहकारमहर्षी कल्लाप्पाण्णा आवाडे, विठ्ठलराव डाके, श्रीनिवास सातपुते, विश्वनाथ मेटे, श्यामसुंदर मर्दा, विश्वनाथ मुसळे, मदनलालजी बोहरा, प्रकाशजी गोरे, विद्याधरजी ताठे, विजयराव करमरकर, बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर, उपाध्यक्ष संजय लेले, संचालक मंडळ सदस्य, ग्राहक, सभासद, इचलकरंजीतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभाचा प्रारंभ दीपप्रज्वलनाने करण्यात आला. या समारंभामध्ये बँकेच्या' जेएसबी ईझी नेट' या मोबाईल

पान क्र. ३ वर ...

➤ पान क्र. १ वरून ...

## अध्यक्षांचे लेखणीतून ...

मिश्रणात कासा ठेवीचे प्रमाणातील घसरण रोखण्यात चार वर्षांनंतर बँकेला यश आले. परिणाम स्वरूप ठेवीची किंमत ८.५९% वरून कमी होऊन ८.३४% एवढी झाली याचा फायदा नफा वृद्धीसाठी झाला. हा क्रम कायम राखीत कासा ठेवीचे प्रमाणात भरीव वाढ होणे गरजेचे आहे. कासा ठेवीच्या वृद्धीसाठी शाखास्तरावर कर्मचाऱ्याकडून काही सूचना असतील तर त्या मुख्य कचेरीस कळवाव्यात. उपयुक्त सूचनांचा बँक गाभीर्याने विचार करील.

दुसरी घटना बँकेची भांडवल पर्याप्तता १२% चा अवघड पल्ला पार करून १३.९०% पर्यंत पोहोचली. बँकेच्या वित्तीय सुदृढतेचे हे प्रमाणपत्र आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार आपली बँक आता खऱ्या अर्थाने 'Strong and Well Managed' झाली आहे. व्यवसायाच्या वृद्धीसाठी ही एक अनुकूल उपलब्धी आहे.

दि. ४ जुलै २०१६ रोजी इचलकरंजी येथील चौंडेश्वरी नागरी सहकारी बँक यांचे ६ शाखा आणि एका विस्तारित कक्षासह आपल्या बँकेत विलीन झाली. विलीनीकरणासाठी अनेक सहकारी संस्थांचे प्रस्ताव अव्हेरून भारतीय रिझर्व्ह बँकेने जनता बँकेची निवड केली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आपल्या बँकेवरील विश्वासाचे ही घटना प्रतीक आहे. दि. २७ जुलै २०१६ रोजी आपली मोशी शाखा कार्यान्वित झाली आणि त्याबरोबर आपला एकूण शाखा विस्तार ६५ शाखा आणि २ विस्तारित कक्ष एवढा झाला आहे. महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक भौगोलिक क्षेत्रात आज आपली उपस्थिती आहे. अद्ययावत संगणक प्रणालीद्वारे समाजाच्या प्रत्येक घटकासाठी त्यांचे आवश्यकतेनुसार उपयुक्त सेवा आपण अव्याहत देत आहोत. राष्ट्रीय स्तरांवर बँक व्यवसायाच्या वृद्धीसाठी पोषक वातावरण बनत आहे. झोकून देऊन काम करणारा कर्मचारी वर्ग ही आपली ताकद आहे. या सर्व घटकांचा फायदा घेत आपण सर्वजण मिळून बँकेच्या व्यवसायवृद्धीत सक्रिय सहभागी होऊयात. परमेश्वर आपल्या पाठीशी आहे.

# खातेदार व सभासद मनाली देव 'युवाश्री' पुरस्काराने सन्मानित




आपल्या कर्वे रोड शाखेच्या खातेदार व सभासद सौ. मनाली देव यांना एप्रिल २०१६ मध्ये गोवा, पणजी येथे झालेल्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेत पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या माइंड ॲण्ड बॉडी योगा इन्स्टिट्यूटला सर्वोत्कृष्ट संघ म्हणून सन्मानित करण्यात आले. मनाली देव या गेली १४ वर्षे योग मार्गदर्शन करीत आहेत. त्या माइंड ॲण्ड बॉडी योगा इन्स्टिट्यूटच्या सहसंस्थापक अध्यक्षा आहेत. आजपर्यंत त्यांनी ६० राष्ट्रीय योगपटू व ३४ आंतरराष्ट्रीय योगपटू घडविले आहेत. त्यांना 'योगगुरू' 'युवा गौरव', 'मोरया पुरस्कार', 'उत्कृष्ट योग शिक्षिका', 'ओम साईनाथ पुरस्कार', 'PCB पुरस्कार', 'अजित पुरस्कार', 'सर्वोत्कृष्ट स्वयंसिद्धा पुरस्कार', 'महिला क्रीडा पुरस्कार' इ. पुरस्कार मिळाले आहेत. आत्तापर्यंत त्यांची दोन वेळा भारतीय महिला योग प्रशिक्षक म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्र संघ महिला प्रशिक्षक म्हणून ९ वेळा काम पाहिले आहे. त्या स्वत: रोपमल्लखांब व योगासनांच्या राष्ट्रीय खेळाडू आहेत.





मनाली यांचा सुपुत्र आमोद देव वय वर्षे ७ याने १५ मे २०१६ रोजी इगतपुरी येथे झालेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत ६-१० वयोगटात प्रथम क्रमांक मिळवला. त्याची कोलकाता येथे होणाऱ्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेकरिता निवड झाली आहे. आत्तापर्यंत त्याने ४ राष्ट्रीय योगासन स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले आहे. राष्ट्रीय स्पर्धेत त्याला २ वेळा 'बालयोगी' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्याने जून, २०१५ मधे दुबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेत लहान गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे. जुलै, २०१५ मध्ये बँकॉक येथे झालेल्या आशियाई योगासन स्पर्धेतही सुवर्णपदक मिळवले आहे.

त्याच्या या यशाबद्दल १५ ऑगस्ट २०१५ रोजी महापौरांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला आहे.

# विलेपार्ले शाखेकडून छोट्या दोस्तांना शैक्षणिक कॅलेंडर 'चिंटू गँग'ची भेट

आपल्या विलेपार्ले शाखेने खास मुलींकरिता छापलेल्या 'चिंटू गँग' या शैक्षणिक कॅलेंडरच्या वाटपाकरिता विलेपार्लेतील सर्व शाळांना भेटी दिल्या. त्यापैकी 'श्री छत्रपती शिवाजी विद्यालया'च्या मुख्याध्यापकांनी दिलेला विशेष अभिप्राय व विद्यार्थ्यांकरिता मुद्दाम छापलेल्या 'चिंटू गँग' हे विद्यार्थ्यांना भेट देण्यात आले. सगळे बालमित्र तर खूश झालेच व शिक्षक मुख्याध्यापिकांनीही बँकेचे कौतुक केले.

# खातेदार व सभासद श्रीराम हर्षे यांना आदर्श शेतकरी पुरस्कार प्रथम क्रमांकाने प्राप्त

श्री. श्रीराम वासुदेव हर्षे हे नेवरे हायस्कूल येथील निवृत्त शिक्षक असून बँकेचे जुने खातेदार आहेत. त्यांचे शाखेत सेव्हिंग खाते, ठेवी असून ते बँकेचे सभासदही आहेत.

श्री. हर्षे यांना नुकतेच जि. प. आदर्श शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (प्रथम क्रमांक) प्राप्त झाला आहे. तसेच, त्यांना यापूर्वी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे.

जिल्हा परिषद कृषी विभागाने पुरस्कार प्राप्त करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी समितीच्या सभेमध्ये उपाध्यक्ष व सभापती सतीश शेवडे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

ही सभा उपाध्यक्ष शेवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी जिल्हा कृषी अधिकारी पी. एन. देशमुख उपस्थित होते. जिल्हा परिषद कृषी विभागाकडून दरवर्षी आदर्श शेतकरी पुरस्कार जाहीर करण्यात येतात. त्याप्रमाणे सन २०१५-२०१६च्या पुरस्कारांचे वितरण कृषी समितीच्या सभेत करण्यात आले.

**पान नं. १ वरून...**

### चौंडेश्वरी सहकारी बँक ...विलीनीकरण

सेवेचे उद्घाटन चंद्रकांतदादा पाटील आणि सुभाषराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. इचलकरंजीतील मान्यवरांचे या प्रसंगी उचित सत्कार करण्यात आले.

प्रारंभी अश्विनीताई कुलकर्णी यांनी लक्ष्मीस्तोत्र म्हटले. यानंतर निखिल दातार यांनी वैयक्तिक गीत सादर केले. पराग ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले, तर श्रीधर विसाळ यांनी आभार मानले.

चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, सधन ठेवीदारांनी जर बँकामध्ये सात वर्षांच्या कालावधीसाठी विनाव्याज ठेव ठेवली तर त्या ठेवीतून बँकांना शेतकऱ्यांसाठी विनाव्याज कर्जपुरवठा करता येऊ शकेल. या नव्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढणे शक्य होईल. ही नवीन संकल्पना मांडताना महसूलमंत्र्यांनी पाच लाखांची विनाव्याज ठेव जनता बँकेत ठेवत असल्याची घोषणा केली. या ठेवीतून शेतकऱ्यांना विनाव्याज कर्जपुरवठा करावा, अशी विनंती बँकेच्या व्यवस्थापनाला पाटील यांनी या वेळी केली.

१२५ कोटींच्या देशाला ऑलिम्पिकमध्ये केवळ दोन पदके मिळू शकतात, ही गोष्ट लाजिरवाणी आहे यासाठी खेळाडूना स्पोर्ट्स लोन देण्याची व्यवस्था बँकांनी करावी. यामुळे खेळाडूंना वेगवेगळ्या क्रीडा प्रकारासाठी लागणारे साहित्य खरेदी करता येऊ शकेल. यातून चांगले खेळाडू निर्माण होण्यास मदत होईल.

चार आजारी बँकांचे यशस्वी विलीनीकरण केलेल्या जनता बँकेने आगामी काळात आणखी काही बँकांचे विलीनीकरण करून घ्यावे म्हणजे लोकांचा सहकारावरील विश्वास दृढ होईल, असे सांगून सहकारमंत्री सुभाष देशमुख म्हणाले, मुद्रा बँक योजनेतून जनता बँकेने इचलकरंजीतील व्यावसायिकांना आर्थिक मदत करावी. कृषी क्षेत्रानंतर सर्वाधिक रोजगार वस्त्रोद्योगातून निर्माण होत असल्याने जनता बँकेने वस्त्रोद्योग व्यवसायाला मदतीचा हात द्यावा जेणेकरून इचलकरंजीमधील वस्त्रोद्योगाची भरभराट होण्यास मदत होईल. माजी खासदार कल्लापाण्णा आवाडे यांनी आपल्या भाषणात वस्त्रोद्योगाविषयीच्या अडीअडचणी मांडल्या.




बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर यांनी बँकेविषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, सहकारी बँकिंग क्षेत्रात सहकारी बँक विलीन करून घेण्याचा पायंडा जनता बँकेने घातला आहे, यामुळे सहकारी बँकिंग क्षेत्र भक्कम होण्यास मदत झाली. इचलकरंजीमधील नागरिकांची आर्थिक भरभराट व्हावी, यासाठी जनता बँक नेहमीच प्रयत्नशील राहील.

## शिवाजीनगर रत्नागिरी शाखा : मान्यवर गुरुजनांचा सत्कार



मंगळवार दि. १९ जुलै २०१६, गुरुपोर्णिमा या दिवशी शाखेतील मान्यवर सभासद व ठेवीदार श्री. विनायक नरहर पोखरणकर व श्री श्रीराम वासुदेव हर्षे या गुरुजनांचा शिवाजीनगर रत्नागिरी शाखेमध्ये सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मा. श्री. महेंद्र मयेकर, नगराध्यक्ष, रत्नागिरी नगरपरिषद, श्री श्रीरंग वैद्य, चार्टर्ड अकाऊंटंट, श्री. दीपकशेठ साळवी, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, शाखाव्यास्थापक श्री. जयंत लोकरे, सेवकवर्ग तसेच खातेदार उपस्थित होते.

श्री. विनायक न. पोखरणकर गुरुजी हे संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक आहेत. ते अच्युतराव पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरी येथे संस्कृत भाषेचे अध्यापक होते. निवृत्तीनंतर पोखरणकर गुरुजी जिज्ञासू विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करीत आहेत. ते त्यांचे विद्यार्थ्यांसह संस्कृत भाषा प्रसारासाठी काम करीत आहेत. श्री श्रीराम वा. हर्षे हे सुद्धा निवृत्त शिक्षक आहेत. निवृत्तीनंतर ते शेती विषयात पूर्णवेळ काम करीत आहेत. रत्नागिरी तालुक्यातील नेवरे या गावी त्यांनी शेतीमध्ये विविध प्रकारचे उपक्रम करून नवीन संकल्पना राबवल्या आहेत. रत्नागिरी जिल्हा परिषदेने त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना नुकताच जिल्हा कृषिभूषण हा पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

शाखेने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून, श्री. विनायक न. पोखरणकर गुरुजी यांना मा. नगराध्यक्ष श्री. मयेकर यांचे हस्ते व श्री श्रीराम वा. हर्षे यांना श्री. श्रीरंग वैद्य यांचे हस्ते सन्मानित केले आहे. बँकेच्या या सभासदांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

### नावात काय आहे?

एका बँकेत एक 'रिअर ॲडमिरल' पेन्शन घेत होते. त्यांना एक पत्र बँकेने पाठविले होते. त्यावर शाखेतील लिपिकाने पाकिटावर चुकून 'रिअल ॲडमिरल' असे लिहिले. सदर पेन्शनर ते पाकीट घेऊन बँकेत आले. जरासे चिडूनच ते म्हणाले, ''मी काय खोटा ॲडमिरल आहे का? जे तुम्ही पाकिटावर 'रिअल ॲडमिरल' लिहिलेत?''

बँकेने त्यांची माफी मागितली व या प्रकरणावर पडदा पडला.




## मेधावी भंडगे हिला आयुर्वेदिक डॉक्टर पदवी प्राप्त



बँकेच्या मुख्य कचेरी मध्यवर्ती समायोजन (COCD) विभागातील अधिकारी डॉ. सुनील दादोजी भंडगे यांची जेष्ठ कन्या आणि बाजीराव रोड शाखेतील खातेदार कु. मेधावी सुनील भंडगे हिस नुकतीच नाशिक येथील महाराष्ट्र आयुर्विज्ञान विद्यापीठाने आयुर्वेद डॉक्टर (वैद्य) पदवी बहाल केली आहे.

कु. मेधावीने पुण्यातील अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयातून आयुर्वेदाचे शिक्षण घेतले. तिने या महाविद्यालयातील आयुर्वेदाचार्य परीक्षेत शालाक्य तंत्र (Opthalmology & ENT) आणि शल्यतंत्र (Surgery) विषयात प्रथम श्रेणी मिळवल्याबद्दल सौ. उर्मिला भाटे (मध्य प्रदेश) पारितोषिक, आयुर्वेदाचार्य परीक्षेत प्रथम प्रयत्नात शालाक्य विषयात प्रथम आल्याबद्दल कै. वैद्य दामोदर अप्पाजी वैशंपायन पारितोषिक, स्त्रीरोग प्रसूतीतंत्र (Gynacology & Obstetircs) विषयात प्रथम प्रयत्नात प्रथम आल्याबद्दल कै. वैद्या सुशीलाबाई बगाराम उपाध्ये पारितोषिक, तृतीय वर्ष आयुर्वेदाचार्य परीक्षेत प्रथम आल्याबद्दल सौ. उर्मिला भाटे (मध्य प्रदेश) पारितोषिक आणि आयुर्वेदाचार्य परीक्षेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय परीक्षेत महाविद्यालयात प्रथम आल्याबद्दल कै. विनायक नारायण माटे पारितोषिक अशी सुमारे रु. ५,०००/- रोख पारितोषिके कु. मेधावीने पटकावली आहेत.

सध्या कु. मेधावी पुण्यातील रुबी हॉस्पिटलच्या अतिदक्षता वैद्यकीय सेवा (Emergency Medical Service) विषयावरील पदविका शिक्षण घेत असून त्यानंतर आयुर्वेदातील पदव्युत्तर (M.D.Medicine) शिक्षण घेणार आहे.

## खातेदार नेहा सावरकर उत्कृष्ट लघुउद्योजक म्हणून सन्मानित

**संगमेश्वर** : शाखेच्या खातेदार सौ. नेहा अनिल सावरकर, रा. म्हाबळे ता. संगमेश्वर यांना लघुउद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीसाठी महाराष्ट्र शासनाकडून सन २०१५ मध्ये उत्कृष्ट लघुउद्योजक म्हणून पुरस्कार देण्यात आला. या पुरस्काराचे वितरण मे २०१६ रत्नागिरी येथे पालकमंत्री मा. श्री. रविंद्र वायकर यांचे हस्ते करण्यात आले.

## व्यवसाय वृद्धी आणि सृजनशीलता

काहीं दिवसा पूर्वी वर्तमानपत्रात बातमी वाचली. युरोपमधील लंडन शहरामध्ये प्रिन्सेस मार्गावर सिटीझन ग्रंथालय नावाचे प्रसिद्ध ग्रंथालय आहे. या ग्रंथालयाने नुकतीच आपली शंभरी पूर्ण केली. दोन लाखांपेक्षा अधिक सक्रिय सभासद, सहा मजली भव्य इमारत आणि तीस लाखांपेक्षा अधिक ग्रंथसंपदा या ग्रंथालयाजवळ आहे. शताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने ग्रंथालयाच्या इमारतीची डागडुजी, रंगरंगोटी करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला. सदर कामासाठी किमान दोन महिने एवढा कालावधी लागणार होता. त्यासाठी ग्रंथालयाची इमारत रिकामी करणे आवश्यक होते. इमारतीतील ग्रंथ संच इतरत्र हलवण्यासाठी येणाऱ्या खर्चावर चर्चा करण्यासाठी ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांची एक बैठक बोलावण्यात आली. खर्च कमी करण्यासाठी प्रभावी उपाय सुचवण्याची विनंती ग्रंथपालांनी कर्मचाऱ्यांना केली. कोणी दहा टक्के, कोणी वीस टक्के, कोणी पन्नास टक्के खर्च कमी करण्यासाठी उपाय सुचवले. पण नुकताच रुजू झालेल्या एका कनिष्ठ कर्मचाऱ्याने सुचवलेला उपाय नावीन्यपूर्ण होता. त्याने सूचना केली की व्यवस्थापनाने ग्रंथालयाबाहेर नोटीस बोर्डावर सभासदांना सूचना करावी की शताब्दिपूर्तीच्या निमित्ताने ग्रंथालय सर्व सभासदांना एक बहुमोल भेट देत आहे. पुढील दोन महिने प्रत्येक सभासदाला एका ग्रंथा ऐवजी वीस ग्रंथ आणि एका आठवड्या ऐवजी दोन महिने ग्रंथ घरी वाचण्यासाठी उपलब्ध करून देत आहे. त्याचा फायदा सभासदांनी घ्यावा. दोन दिवसात सर्व ग्रंथ इमारती बाहेर गेले. रंगरंगोटी नंतर पुन्हा ग्रंथालय पूर्ववत सुरू झाले. ग्रंथ संच हलवण्याचा व्यवस्थापनाला कसलाही खर्च आला नाही. व्यवस्थापनाने ही योजना सुचविलेल्या कर्मचाऱ्याला बढती देऊन त्याचा सत्कार केला.

व्यवस्थापन शास्त्रात कर्मचाऱ्याच्या या सूचनेला सृजनशीलता म्हणतात कांहीतरी नवीन युक्ती अथवा मनात योजलेली कल्पना हीच सृजनशीलता. सृजनशीलतेतून नावीन्याचा जन्म होतो. नावीन्यातून व्यवसाय वृद्धी होते. बँक व्यवसाय आणि त्याच बरोबर बँकांच्या समस्या देखील अधिकाधिक क्लिष्ट होत आहेत. बँकेचा ग्राहक आणि बँकेचा कर्मचारी या दोहोंच्या मानसिकतेत मोठे बदल होत आहेत. बँकेतील प्रश्नांना सोडवण्यासाठी वापरले जाणारे पुस्तकी उपायांचा असर एकतर कमी झाला आहे अथवा ते उपाय आता कुचकामी ठरत आहेत.

व्यवसाय वृद्धी, कासा ठेवीची वाढ, नफा वृद्धी, छोट्या कर्जाचा विस्तार थकीत कर्जाची वसुली, व्यवस्थापन-कर्मचारी संबंध, ग्राहक सेवा या आणि यासारखे अनेक विषय कर्मचाऱ्यांच्या सृजनशीलतेतून सोडवता येतात. कर्मचाऱ्यांच्या सृजनशीलतेतून संस्थेचा विकास होतो. यशस्वी संस्थेच्या वाटचालीत तेथे कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सृजनशीलतेचा सहभाग मोठा असतो. शाखास्तरावर कर्मचाऱ्यांना चौकटी बाहेर विचार करण्यास प्रवृत्त करणे गरजेचे आहे. नवीन तरूण कर्मचाऱ्यांत संस्थेतील या प्रश्नाकडे अनेक अंगांनी बघण्याची शक्ती असते. त्यांचा दृष्टीकोन ताजा असतो. त्यांच्या विचारात नाविन्य असते. त्यांना प्रोत्साहन द्या. त्यासाठी त्यांना वेळ द्या, संधी द्या, शक्य झाल्यास साधने देखील उपलब्ध करून द्या. सृजनशीलतेसाठी कर्मचाऱ्याची शैक्षणिक पात्रता, अनुभव, हुद्दा अथवा श्रेणी यांची मर्यादा नाही. नवशिका, कनिष्ठ कर्मचारी देखील तुमच्या प्रश्नांना प्रभावी तोडगा सुचवू शकतो. त्यांना सहभागी करून घ्या. उपयुक्त सूचकांचा उचित गौरव करा. त्यांच्या सूचनांचा आपण आदर करतो अशी जाणीव त्यांच्यात निर्माण करा. त्यातून त्यांना प्रेरणा प्राप्त होईल.

सृजनशील कर्मचारी कल्पक असतो, तो पुढाकार घेतो, तो जिज्ञासू, चौकस असतो, त्याची जोखीम घेण्याची तयारी असते, त्याची ओढ भविष्याकडे असते, त्याला नाविन्याचा ध्यास असतो, तो संस्थेशी एकनिष्ठ असतो, त्याची कष्टाची तयारी असते. सृजनशील कर्मचारी ओळखा. त्याला बळ द्या.

## बँकेतर्फे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना 'दहावी नंतरची शाखा निवड' पुस्तकाची भेट



आपल्या बँकेच्या सहकार्याने सजग नागरी मंचचे अध्यक्ष व करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर यांनी लिहिलेल्या दहावीनंतरची शाखा निवड या पुस्तकाचे प्रकाशन पुणे महानगरपालिकेचे आयुक्त कुणाल कुमार यांच्या हस्ते दिनांक १३ जून, २०१६ रोजी करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष संजय लेले, पुस्तकाचे लेखक विवेक वेलणकर, महानगरपालिका शिक्षण मंडळ (माध्यमिक) प्रमुख श्याम दौंडकर, बँकेच्या नियोजन विभागाचे प्रमुख राधाकृष्ण लिमये आदी मान्यवर उपस्थित होते.

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधून यंदाचे वर्षी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या दोन हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना हे पुस्तक गुणपत्रिकेसह लवकरच भेट म्हणून दिले जाणार आहे. दहावीनंतर पुढे काय, या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे करण्यात आला आहे. या पुस्तकामध्ये वैद्यकीय, अभियांत्रिकी, विधी, यांसारख्या अभ्यासक्रमाबरोबरच

**महापालिका आयुक्त कुणाल कुमार यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन**

गृहविज्ञान, व्यावसायिक अभ्यासक्रम, मोफत अभियांत्रिकी अभ्यासक्रम, मोफत व्यवसाय शिक्षण याबाबतची माहिती देण्यात आली आहे. याचबरोबर केंद्र व राज्य सरकारच्या कौशल्य शिक्षणावर आधारित योजनांच्या माहितीचा देखील समावेश करण्यात आला आहे.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांबरोबरच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनादेखील हे पुस्तक भेट म्हणून दिले जाणार आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक नक्कीच दिशादर्शक ठरेल, अशी आशा उपस्थितांनी व्यक्त केली.

## आपली बँक : समाजऋण मानणाऱ्या दानशूरांसाठी विश्वसनीय माध्यम!

बँकेच्या एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागामार्फत ग्राहक व नागरिकांच्या इच्छापत्र व ट्रस्टचे व्यवस्थापन केले जाते. विविध ट्रस्टच्या माध्यमातून विश्वस्तांच्या सूचनेनुसार शैक्षणिक व सामाजिक कारणासाठी आर्थिक सहाय्य करण्यात येते.

बँकेकडे व्यवस्थापनासाठी असलेल्या विविध विश्वस्त निधीतून दुष्काळग्रस्त भागात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना आर्थिक सहाय्य करण्यात येते.

बँकेकडे व्यवस्थापनासाठी असलेल्या विविध विश्वस्त निधीतून दुष्काळग्रस्त भागात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांना नुकतेच आर्थिक सहाय्य करण्यात आले.

बँकेकडे व्यवस्थापनासाठी असलेल्या कृतज्ञता सार्वजनिक विश्वस्त निधीतून दुष्काळग्रस्त भागात कार्य करणाऱ्या रा. स्व. संघ जनकल्याण समिती व लोकमंगल सेवा प्रतिष्ठान (विश्व हिंदू परिषद) या सामाजिक संस्थांना नुकतीच आर्थिक मदत करण्यात आली. जनकल्याण समिती दुष्काळग्रस्त भागातील लोकांसाठी पाण्याची सोय करणार आहे. तर लोकमंगल सेवा प्रतिष्ठान जनावराकरिता छावणी उभारून त्यांचे पोषण करीत आहे. त्यांना जनावराकरिता चारा उपलब्ध करून देण्याकरिता कृतज्ञता ट्रस्टमधून आर्थिक मदत करण्यात आली.

तसेच धोपावकर परिवार ट्रस्टमधून विविध सामाजिक संस्थांनाही आर्थिक सहकार्य करण्यात आले. त्यात स्व. तात्या बापट स्मृती समिती, विद्यार्थी सहाय्यक समिती, स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन या संस्थांना आर्थिक मदत करण्यात आली. स्व. तात्या बापट स्मृती समिती-चिंचवड ही पूर्वांचल विकासासाठी कार्य करते तर विद्यार्थी सहाय्यक समिती-पुणे ही विद्यार्थ्यांकरिता अल्प दरात भोजन व निवासाची सोय उपलब्ध करून देते. व स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन-धायरी पुणे ही संस्था स्किझोफ्रेनियाग्रस्त व कुटुंबातील सदस्यांकरिता अवेअरनेससाठी काम करते. यांना मदतीच्या धनादेशाचे वितरण प्रसंगी बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री. सुनील कामत बोलत होते. योग्य व्यक्तींना मदत करण्याची इच्छा असूनसुद्धा व्यग्र जीवनशैलीमुळे वेळीच मदत करणे शक्य होत नाही. बँक समाजातील दानशूर व गरजू यांचा समन्वय साधते. आर्थिक दान देणाऱ्यासाठी बँक विश्वसनीय माध्यम ठरत आहे. हेच यातून दिसून येत आहे.

या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, यातील बँकेची विश्वासाची भूमिका महत्त्वाची असून, विश्वस्त आणि समाजातील गरीब, गरजू यांचा मेळ जमविण्यास बँक विविध ट्रस्टची कामे विश्वासाने करीत आहे.

या विभागामार्फत ट्रस्टची नोंदणी, व्यवस्थापन, निधीची गुंतवणूक लाभदायक करणे, तसेच इच्छापत्र तयार करण्यासाठी मदत व व्यवस्थापन करणे. या कामी तज्ज्ञ वकिलांचा सल्ला मिळवून देण्याचे कार्यही केले जाते, अशी माहिती विभागप्रमुख श्री. किशोर वेलिंग यांनी या प्रसंगी दिली.

# बँकेची मोशी शाखा कार्यान्वित

## ह.भ.प. डॉ. किसन महाराज साखरे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**पुणे :** बदलत्या काळानुरूप अत्याधुनिक बँकिंग सेवा देणाऱ्या आपल्या बँकेच्या मोशी शाखेचे उद्‌घाटन पूजनीय हभप डॉ. किसन महाराज साखरे यांच्या हस्ते; तर तेथील एटीएम केंद्राचे उद्‌घाटन बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर यांच्या हस्ते दिनांक २७ जुलै २०१६ रोजी एका दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे संचालक मंडळ सदस्य, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत केतकर, मान्यवर ग्राहक, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बँकेचे अध्यक्ष मा. अरविंद खळदकर यांच्या हस्ते किसन महाराज साखरे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या मान्यवर व्यक्तींचे बँकेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आले.

बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर म्हणाले, मोशी हा भाग वेगाने विकसित होत आहे. या भागातील नागरिकांना आधुनिक बँकिंग सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बँकेने येथे नव्याने शाखा सुरू केली आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा. हभप किसन महाराज साखरे यांनी आपल्या मनोगतात व्यवहार आणि आध्यात्म यामधील अर्थाविषयी विवेचन केले. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत केतकर यांनी प्रास्ताविक केले. शाखा व्यवस्थापक संजय गोसावी यांनी आभार मानले. मुख्यव्यवस्थापक राधाकृष्ण लिमये यांनी सूत्रसंचालन केले.

बँकेची मोशी ही ६५वी शाखा आहे. या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना अत्याधुनिक बँकिंग सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एनिव्हेअर बँकिंग, NEFT, RTGS, विमा आदींचा समावेश आहे.



बँकेच्या ६५व्या मोशी शाखेचे उद्‌घाटन हभप डॉ. किसन महाराज साखरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे मोशी शाखा व्यवस्थापक संजय गोसावी, उपाध्यक्ष मा. संजय लेले, संचालक जगदीश कदम, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत केतकर, अध्यक्ष मा. अरविंद खळदकर आदी. मान्यवर उपस्थित होते.

## बँकेच्या विशेष उपक्रमानुसार ओतूर येथे विद्यार्थ्यांचा सत्कार



दहावीच्या परीक्षेत यंदा विशेष यश संपादन केलेले विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षकांचा आपल्या ओतूर शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दहावीच्या परीक्षेत यशाचे शिखर पार करणारे ओतूर परिसरातील शाळांचे सुमारे १०० विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सत्कार समारंभाला उपस्थित होते. या प्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांना 'सुगम मराठी व्याकरण व लेखन' हे पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या पालक व शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला.

शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य कृणाल कोरे, शाखा व्यवस्थापक, बाबासाहेब जाधव यांनी या वेळी विद्यार्थ्यांसमोर मार्गदर्शक विचार मांडले. कार्यक्रमप्रसंगी चैतन्य विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी अस्वार, उपमुख्याध्यापक पी. जे. शिंदे, भाऊसाहेब खाडे, सुभाष मुळे, माणिक वाळेकर, गणेश तांबे, बँकेचे सहाशाखा उपव्यवस्थापक मारुती नवले, मंदार भिडे, प्रमोद बेल्हेकर, बबन गुंजाळ, हरिभाऊ कुंडले आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल कुसूरकर व सचिन पिंगट यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन राजेंद्र क्षीरसागर यांनी केले. आभार पराग सबनीस यांनी मानले.

## एनपीए चे प्रमाण कमीत कमी राखल्याबद्दल बँकेला पुरस्कार प्राप्त



'पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. पुणे' यांचे तर्फे सन २०१५ – १६ अखेर ढोबळ एनपीए चे प्रमाण ५ % चे आत राखल्याबद्दल आपल्या बँकेला पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. ही अभिमानाची बाब असून आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने आपल्या बँकेस पुरस्कार मिळालेला आहे.

## फोटोग्राफी विषयक कार्यक्रमातील सहभागातून अहमदनगर शाखेचा मार्केटिंगचा प्रयत्न

**नगर :** नगर शहराच्या ५२६ व्या स्थापनादिनानिमित्त 'फोटोग्राफर बहुउद्देशीय विकास मंचा'ने आयोजित केलेल्या फोटोग्राफी स्पर्धेत जिव्हेश्वर मंगल कार्यालयात पारितोषिक वितरण झाले.

नगर शहराच्या स्थापनादिनानिमित्त व्यावसायिक फोटोग्राफी, हौशी फोटोग्राफी व मोबाइल फोटोग्राफी अशा तीन गटांत स्पर्धा घेण्यात आली. या विजेत्यांना युनायटेड इन्शुरन्स कंपनीच्या व्यवस्थापक संध्या देवभानकर यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या वेळी बँकेचे शाखा व्यवस्थापक मकरंद जोशी, चंद्रशेखर जोशी, विकास अधिकारी शिवाजी मोरे, संजय मोरे, अध्यक्ष नितीन भिसे, सतीश कोबारणे, राजू भोरे आदी उपस्थित होते. उद्‌घाटन समरंभामध्ये सहभागी होऊन बँकेविषयी व बँकेच्या विविध कर्ज/ ठेवी इ. बाबत माहिती देण्याची संधी मिळाली.

# आनंदाची पाठशाळा : ‘ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला’

## शिक्षकाचा पेशा :

‘‘अनिरुद्ध, काही क्षेत्रे अशी असतात की तेथे यशस्वी होण्यासाठी वेगळे मापदंड असतात. शिक्षकाचा पेशा हा त्यापैकीच एक आहे. शिक्षकाचे प्रमुख काम असते शिकवणे. खरेतर शिक्षक हा पुस्तक आणि विद्यार्थी यांमधील समन्वय साधणारा घटक आहे. शिक्षक विषय सोपा करून समजावून सांगणारा मध्यस्थ (Facilitator) आहे. तसेच अनुभवी मार्गदर्शक सल्लागार आहे. थोडक्यात तो मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक आहे.

उत्तम शिक्षक होणे याचा अर्थ विद्यार्थ्यांशी असलेली बांधिलकी स्वीकारणे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, नैतिक आणि सामाजिक प्रगतीचे उत्तरदायित्व स्वीकारणे, विद्यार्थ्यांची प्रगती हेच आपले यश मानणे, असा असतो. आपला विद्यार्थी आपल्यापेक्षा ज्ञानी व्हावा आणि त्यासाठी आपण त्याला सर्वतोपरी साहाय्य करावे, अशी शिक्षकाची मानसिकता असायला हवी. म्हणजेच ‘शिष्यात इच्छेत पराजयात’.

उत्तम शिक्षक आपल्या करिअरमध्ये नुसतेच चांगले विद्यार्थी घडवतो असे नाही, तर तो समाजाच्या प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देत असतो. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न सोडविणे हे तर शिक्षकाचे काम आहेच, पण त्याला समुपदेशन करता आले, विद्यार्थ्याला आपल्या पायावर सक्षमपणे उभे करता आले, सामाजिक भान




देता आले, त्याला विद्यार्थ्यांचा सल्लागार, मार्गदर्शक होता आले, तर दुधात साखर असेच म्हणावे लागेल. खरेतर अशाच शिक्षकांची नितांत गरज आहे.

आता एक करिअर म्हणून या पेशाकडे कसे पाहायचे ते बघू.

**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित ‘ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला’ या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.**

महाविद्यालयीन शिक्षकांना संशोधन करण्याचा मार्ग उपलब्ध असतो. आपल्या विषयामध्ये तज्ज्ञ होणे, संशोधन प्रकल्प स्वीकारणे, तंत्रज्ञान निर्मिती किंवा समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांवर मार्गदर्शन, पुस्तकांचे लिखाण, साहित्यनिर्मिती, मुलांमधील आत्मविश्वास वाढवणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभाग, सामाजिक कार्यात योगदान असे अनेक पर्याय या शिक्षकांच्या प्रगतीसाठी उपलब्ध आहेत. मात्र शिक्षकाची तशी मानसिकता असणे गरजेचे आहे.

अनिरुद्ध, मला वाटते आता तुला शिक्षकी स्वीकारण्याआधी विचार करावयास थोडी तरी दिशा मिळाली असेल.

तुझ्या मनात सरकारी सनदी नोकरी हेही क्षेत्र आहे. त्यामध्येसुद्धा उत्तम करिअर करता येईल. सर्वसामान्यपणे विचार करता सरकारी क्षेत्र हे चाकोरीबद्ध वाटेल, पण सामाजिक भान आणि बांधिलकी असलेल्या व्यक्तीस इथे काम करण्याची उत्तम संधी असू शकते. अर्थात कार्यसंस्कृतीचा कल लोकांचे प्रश्न सोडवण्याकडे असावा. आपण जनतेचे सेवक आहोत हे विसरू नये त्यामुळे जनतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यावर जनता प्रेम करते.

मित्रांनो, आता करिअरविषयक निवड कशी करावी, हे थोडक्यात सांगतो.

**करिअरच्या निवडीची ५ सूत्रे :**

१) तुम्हाला आवडणारे क्षेत्रच निवडा.

२. ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे त्यासाठीचे योग्य शिक्षण आणि कौशल्य प्राप्त करा.

३. जे क्षेत्र निवडणार आहात त्याला बाजारात किती मागणी आहे ते अभ्यासा.

४. बदलाशी मैत्री करा आणि कार्यकौशल्याबरोबर जीवनावश्यक कौशल्येही आत्मसात करा.

५. कामाची बांधिलकी स्वीकारा, अनुभवातून शिका आणि स्पर्धात्मक व्हा.

मित्रांनो, ही पंचसूत्री समजून घ्या, शिवाय अनुभवातून ज्या गोष्टी तुम्हाला मिळत असतात, त्यातून आपण स्वत:ला स्पर्धात्मक बनवणे गरजेचे आहे.

**करिअरचा ‘थ्री एस फॉर्म्युला’ :** करिअरची वाटचाल करताना आणखी एक गोष्ट ध्यानात घ्यावी. कोणत्याही करिअरमध्ये पुढील ३ गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न करावा.

१. सिक्युरिटी
२. सक्सेस
३. सॅटिस्फॅक्शन

थोडक्यात याला आपण करिअरचा ‘थ्री एस फॉर्म्युला’ म्हणू.

मराठीमध्ये याला आपण स्थैर्य, यश आणि समाधान असे म्हणू.

स्थैर्य म्हणजे आर्थिक स्थैर्य, ज्यामुळे आपल्या वर्तमानकाळातील तसेच भविष्यकाळातील गरजा भागवता येतील. कोणतीही नोकरी किंवा व्यवसाय करताना उत्तम आर्थिक प्राप्तीद्वारे आर्थिक स्थैर्य मिळवणे हे प्रत्येकाचे प्राथमिक उद्दिष्ट असायला हवे.

यश मिळवणे म्हणजे तुम्ही जी नोकरी किंवा उद्योग कराल त्यामध्ये प्रगतीची संधी असणे व प्रगती करणे आवश्यक आहे. याचाच अर्थ यशस्वी होणे असा आहे. हे आपले दुसरे उद्दिष्ट आहे.

समाधान मिळवणे हे आपले तिसरे उद्दिष्ट असावे. म्हणजेच जे काही काम आपण करू, ते करत असताना आयुष्यातील एखाद्या टप्प्यावर तरी आपल्याला कृतकृत्य वाटले पाहिजे, समाधान लाभले पाहिजे.

स्थैर्य, यश आणि समाधान या तिन्ही गोष्टी साध्य झाल्या, तर आपले करिअर नक्कीच यशस्वी झाले.

मित्रांनो, आज इथेच थांबू आणि पुढच्या भेटीत बुद्धिमत्ता, कल आणि क्षमता या गोष्टीही समजून घेऊ.’’

**क्रमश:**

# बँकेची पेण शाखा कार्यान्वित

## पेण नगरपरिषदेच्या अध्यक्षा सौ. प्रीतम पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

आपल्या बँकेच्या पेण शाखेचे उद्घाटन पेण नगरपरिषदेच्या अध्यक्षा सौ. प्रीतम ललित पाटील यांच्या हस्ते; तर येथील एटीएम केंद्राचे उद्घाटन पेण, सुधागड मतदारसंघाचे आमदार धैर्यशील पाटील आणि बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर यांच्या हस्ते नुकतेच एका दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले.

या प्रसंगी बँकेचे संचालक मंडळ सदस्य, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत केतकर, मान्यवर ग्राहक, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर यांच्या हस्ते पेण नगरपरिषदेच्या अध्यक्षा सौ. प्रीतम पाटील व आमदार धैर्यशील पाटील यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या मान्यवर व्यक्तींचे बँकेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आले.

पेण शहराच्या आर्थिक दृष्टीने सक्षम बँकेची आवश्यकता होती ही उणीव जनता सहकारी बँक पुणेने भरून काढली, असे सांगून आमदार धैर्यशील पाटील म्हणाले की, पेणमध्ये जनता सहकारी बँकेचे पेणवासीयांच्या वतीने मी स्वागत करतो. कोकणचे प्रवेशद्वार असणाऱ्या पेणमध्ये जनता बँकेची आणि येथील व्यावसायिकांची नक्कीच भरभराट होईल.

पेण नगरपरिषदेच्या अध्यक्षा प्रीतम ललित पाटील, उद्घाटन केल्यानंतर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, देशाच्या सहकारी बँकिंग क्षेत्रातील आघाडीची बँक आज पेण शहरामध्ये सुरू झाली, याचा आम्हाला विशेष आनंद होत आहे. सहकारी बँका टिकणे आणि त्याची भरभराट होणे ही काळाची गरज आहे. आगामी काळात जनता बँकेची आणि पेणमधील जनतेच्या व्यवसायात नक्कीच वृद्धी होईल. या वेळी बँकेचे वरिष्ठ अधिकारी दिलीप कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले व पेण शाखा व्यवस्थापक नरेंद्र अत्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**पेण शाखेचे उद्घाटन पेण नगरपरिषदेच्या अध्यक्षा प्रीतम ललित पाटील यांच्या हस्ते नुकतेच एका दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. या प्रसंगी पेण, सुधागड मतदारसंघाचे आमदार धैर्यशील पाटील, बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर आदी मान्यवर उपस्थित होते.**

बँकेची पेण ही ६६ वी शाखा आहे. ही शाखा प्लॉट नं. ५२, वीर सावरकर मार्ग, एमएसईबी ऑफिस समोर, अंतोरा रोड, पेण ४०२ १०७ येथे सुरू करण्यात आली. या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एनिव्हेअर बँकिंग, NEFT, RTGS विमा आदींचा समावेश आहे.

## लातूर शाखेतर्फे रक्तदान शिबिर संपन्न



लातूरमध्ये रक्ताचा तुटवडा नेहमी जाणवत असल्याने लातूर शाखेने डॉ. भालचंद्र ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले.

डॉ. हेडगेवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून श्री. सत्यनारायणजी कर्वा, श्री. वैजनाथअप्पा लातुरे, श्री. हुकूमशेठ कलंत्री व श्री. जोगिंदरसिंह बिसेन सर यांनी या शिबिराचे उद्घाटन केले.



या शिबिरात शाखेतील सेवक व खातेदार मिळून १०१ जणांनी रक्तदान केले. त्यात महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स या कंपनीतील सुमारे ४० कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. शिबिरास तीनशे खातेदारांनी भेटी दिल्या.

# बाजीराव रोड शाखेमध्ये गणेशोत्सव उत्साहात संपन्न





## स्पर्धा उपक्रमांची धामधूम

ढोल-ताशांचे गजरात सेवकांचे उपस्थितीत श्रींची मिरवणुकीने बाजीराव रोड शाखेचे टेरेसवर असलेल्या गणेश हॉल येथे उपमहाव्यवस्थापक मा. श्री. कश्यप साहेब यांचे शुभहस्ते प्रतिष्ठापना झाली. गणेश हॉलमध्ये डेटा सेंटरमधील सेवक श्री. आनंद ताडला व सहकारी बंधू यांनी सुरेख अशी विश्रामबाग वाड्याची प्रतिकृती साकारली होती जी सर्वांना इतिहासाची आठवण करून देत होती.

या वर्षी श्रींच्या आरतीसाठी दहा दिवसांमध्ये मा. सामाजिक न्याय, मदत व पुनर्वसन, अल्पसंख्याक व वक्फ बोर्ड मंत्री, महाराष्ट्र राज्य मा. श्री. दिलीपराव कांबळे, रा. स्व. संघाचे पुणे महानगर कार्यवाह मा. श्री. महेशराव करपे, बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष मा. श्री. संजय लेले तसेच संचालक मंडळातील संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री जयंत काकतकर, सर्व मा. विभागप्रमुख, मुख्य कचेरी तसेच पुणे शहर व जिल्ह्यातील शाखांचे मा. शाखा व्यवस्थापक, जनता बँक पुणे स्टाफ वेलफेअर असोसिएशन, जनता बँक वेलफेअर सोसायटी, जनता बँक पुणे कला क्रीडा मंडळ यांचे मा. अध्यक्ष व सर्व सदस्य उपस्थित होते. या वर्षीचे विशेष म्हणजे बँकेच्या महिला सेवकांचे हस्ते एक दिवस श्रींची आरती झाली. आरतीनंतर आहारतज्ज्ञ डॉ. जुई पटवर्धन यांनी आहारविषयक माहिती दिली.

गणेशोत्सवात श्री सत्यनारायण महापूजा व श्री गणेशयागाचे आयोजन करण्यात आले होते. बँकेच्या सर्व शाखांना व विभागांना श्रींचा रोजच्या आरतीचा व गणेशयागाचा प्रसाद वाटप करण्यात आला.

या वर्षी सेवकांच्या कॅरम तसेच हस्ताक्षर व निबंध लेखनाच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

श्रींच्या विसर्जन मिरवणुकीत सर्व सेवक बंधू-भगिनींनी फेटा बांधला होता. श्रींची विसर्जन मिरवणूक अत्यंत वाजत गाजत उत्साहात पार पडली. सर्वांनी लाडक्या गणेशाचे मनोभावे पूजन करून विसर्जन केले.

बँकेचा गणेशोत्सव यंदा २९ व्या वर्षात सर्व सेवक बंधू-भगिनी, जनता बँक पुणे स्टाफ वेलफेअर असोसिएशन, जनता बँक वेलफेअर सोसायटी, जनता बँक पुणे कला क्रीडा मंडळ यांच्या सहभागाने अत्यंत उत्साहात व आनंदात साजरा झाला.



## गडहिंग्लज शाखा उद्घाटन कार्यक्रम संपन्न

श्री चौंडेश्वरी सहकारी बँक विलीनकरण प्रक्रियेअंतर्गत दि. ४/७/२०१६ रोजी बँकेची गडहिंग्लज शाखा सुरुवात झाली आहे. शाखेचा उद्घाटन समारंभ शाखेच्या इमारतीत पार पडला. या कार्यक्रमास बँकेचे संचालक मा. श्री. महेंद्र पवार व मुख्य कचेरीतील उपमहाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर साठे उपस्थित होते.

शाखा व्यवस्थापक श्री. मंगेश तिरकन्नाड यांनी कार्यक्रमाचे प्रयोजन सांगितले व उपस्थितांचे स्वागत केले. तसेच उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. या नंतर श्री महालक्ष्मी प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन उपस्थित मान्यवर श्री. भास्कर कामत, मा. संघचालक उत्तर कोल्हापूर जिल्हा, जागामालक श्री. मुल्ला, खातेदार श्री. तोरगल्ली, श्री. मदन देशपांडे, संघटक भारतीय किसान संघ, श्री. अभ्यंकर अधिकारी एलआयसी गडहिंग्लज यांचे स्वागत बँकेचे माननीय संचालक श्री. पवार व श्री. चंद्रशेखर साठे यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी श्रीसूक्त पठण करण्यात आले.

यानंतर श्री. साठे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये बँकेची प्राथमिक माहिती दिली. यानंतर मा. संचालक श्री. पवार साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी बँकेची आर्थिक स्थिती, बँकेचे बँकिंग क्षेत्रातील स्थान, बँकेचे सामाजिक उपक्रम, बँकेने व्यवसायाच्या वाटचालीत गाठलेले विविध टप्पे यांची माहिती दिली. उपस्थित खातेदारांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये बँकेचे नाव चांगले आहे, सेवा चांगली आहे, लोकांचे मनात विश्वास आहे, व गडहिंग्लजमध्ये चांगला व्यवसाय होईल, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. तसेच या भागात शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणावर असल्याने शेतकरी वर्गासाठी विशेष कर्ज योजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारपदी (सीईओ) जयंत काकतकर



आपल्या बँकेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (सीईओ) श्री. जयंत काशिनाथ काकतकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. काकतकर यांनी श्री. जयंत केतकर यांचेकडून या पदाची सूत्रे नुकतीच स्विकारली.

श्री. काकतकर हे उच्चविद्याविभूषित असून त्यांनी MCom, CAIIB, LLB, DTL, GDCA या पदव्या संपादित केल्या आहेत. पुण्यातील वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूट (VAMNICOM) आणि रिझर्व्ह बँकेच्या कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकिंग (CAB) पुणे यांनी त्यांना पाहुणे व्याख्याते म्हणून गौरविले आहे तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग ॲन्ड फायनान्स (IIBF), मुंबई यांचे ते फेलोमेंबर आहेत. सन २०१४ मध्ये महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन यांनी त्यांना जनरल मॅनेजर या श्रेणी मधील 'उत्कृष्ठ कर्मचारी' या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

श्री. काकतकर गेल्या तीस वर्षांपेक्षा अधिक काळ आपल्या बँकेमध्ये कार्यरत असून त्यांनी लेखनिक ते सहमहाव्यवस्थापक अशा विविध पदांवर काम केले आहे. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (सीईओ) नियुक्ती होण्यापूर्वी ते सह महाव्यवस्थापक (कर्ज) या पदावर काम करीत होते.

गरूडझेप परिवारातर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा!

# मोबाईल बँकिंग

आपली बँक आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात अद्यावत तंत्रज्ञानावर आधारित नवनवीन सुविधा खातेदारांना उपलब्ध करुन देण्याचा सतत प्रयत्न करीत असते. त्या अनुषंगाने ऑक्टोबर २०१४ मध्ये इंटरनेट बँकिंग सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. त्याचेच पुढील पाऊल म्हणून मोबाईलचा वापर दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे दिवसाचे २४ तास ३६५ दिवस कोठूनही खाते व्यवहार करण्यासाठी इंटरनेट बँकिंगचे मोबाईल ॲप्लीकेशन दि. २९/०७/२०१६ पासून खातेदारांस उपलब्ध करुन दिलेले आहे.

मोबाईल ॲप्लीकेशन उपलब्ध असलेल्या सुविधा पुढीलप्रमाणे :

१) खातेदारांची बँकेमधील असलेल्या सर्व प्रकारच्या खात्यांची माहिती उदा. बचत ठेव खाते, चालू ठेव खाते, कॅश क्रेडिट खात्यांमधील शिल्लक पाहणे, खाते व्यवहारांचा तपशील जाणून घेणे.

२) स्वत:च्या अन्य खात्यामध्ये व बँकेतील इतर खातेदारांच्या खात्यामध्ये पैशांचे हस्तांतरण करणे.

३) आर.टी.जी.एस., नेफ्ट, आय. एम. पी. एस. चा वापर करुन अन्य बँकेच्या खात्यांमध्ये पैशांचे हस्तांतरण करणे.

४) मुदत ठेव व आवर्ती ठेव खाते उघडणे.

५) मोबाईल व डीटीएच रिचार्ज करणे.

६) वीज इन्सुरन्स, फोन, पोस्टपेड मोबाईल इ. सेवांचा देयकांचा भरणा करणे.

७) पुणे महानगरपालिका मिळकतकर भरणे.

८) चेक बुकची मागणी करणे. चेक स्टॉप पेमेंट करणे, चेक बाबतची माहिती बघणे.

९) सदर सुविधे अंतर्गत दिलेल्या मुदत ठेव खाते उघडणे, चेक बुकची मागणी इ. सूचनांची माहिती पाहणे.

१०) लॉगिन व ट्रान्झॅक्शन पासवर्ड बदलणे.

११) बँकेतील सर्व शाखांची व एटीएमची माहिती उदा. पत्ता, आय.एफ.एस.सी. कोड ची माहिती.

सदर मोबाईल ॲप्लीकेशन हे अँड्रॉईड, ॲपल, व विंडोज मोबाईलसाठी बनविण्यात आलेले असून सध्या अँड्रॉईड मोबाईलधारकांसाठी गुगल प्ले स्टोअर वर उपलब्ध असून, लवकरच ॲपल, व विंडोज मोबाईलसाठी उपलब्ध करुन देत आहोत. तसेच इंटरनेट बँकिंग मधील बेनिफिशरि ॲडिशन ही सुविधा उपलब्ध करुन देत आहोत.

सदर सुविधा ही वापरण्यासाठी अत्यंत सोपी व सुरक्षित असून सुरक्षिततेबाबत सर्व प्रकारची दक्षता घेण्यात आलेली आहे. सदर सुविधाही इंटरनेट बँकिंगचे मोबाईल ॲप्लीकेशन असल्यामुळे बँकेची इंटरनेट सुविधा वापरणारे खातेदार याचा उपयोग करु शकणार आहेत.

तरी आपल्या बँकेची मोबाईल बँकिंग सेवा वापरुन आपली सर्व कामे एका क्लिक वर करुन आपला अमूल्य वेळ व श्रम वाचवा.

**श्री. पंकज पांचाळ**

# टिळक रोड शाखेने 'कासा' अभियानांतर्गत आयोजिला परिसंवाद

वस्तू आणि सेवा कर या विषयांवर 'कासा' अभियानांतर्गत टिळक रोड शाखेने परिसंवादाचे नुकतेच आयोजन केले होते. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्राहक परिवार व व्यापारी उपस्थित होते. मुख्य कार्यालयातर्फे श्री. जयंत काकतकर व श्री. डी. जी. कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती.

मुख्य पाहुणे श्री. जयंत काकतकर व श्री. डी. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. संजय चतुर यांनी सुरुवातीच्या भाषणात बँक अधिकारी व वक्त्यांचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमाला शाखाव्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी बँकेचा इतिहास व उज्वल कामगिरीबद्दलची माहिती उपस्थितांना सांगितली. अधिकारी श्री. कौस्तुभ दातार यांनी बँकेच्या तंत्रज्ञानावर आधारित सेवांवर PPT सादर करून माहिती दिली. चार्टर्ड अकौंटंट श्री. अभ्यंकर हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व वक्ते होते. त्यांनी



PPT सादरीकरणाद्वारे 'वस्तू आणि सेवा कर' हा विषय समजावून सांगितला. कायदा व त्याची परिणामकारकता उलगडून सांगितली. शिवाय व्यापारी, खातेदार व प्रेक्षकांच्या शंकांची सविस्तर उत्तरे दिली. श्री. हेमंत भट यांनी सर्वांचे आभार मानले.

# गणेश सजावटीसाठी वापरलेल्या बिस्किटांचा अनाथ विद्यार्थ्यांना 'प्रसाद'

पुणेकर मंडळी गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळातून तसेच घरगुती गणपतीसाठी आकर्षक सजावटी अतिशय उत्साहाने करीत असतात. याच धर्तीवर आणि प्रेरणेतून पुण्यातील अशाच तीन उत्साही बंधूंनी एकत्रितपणे नावीन्यपूर्ण आणि सर्जनशील कल्पनेतून त्यांचे घरगुती गणपतीची आरास केली होती. बँकेच्या मुख्यकचेरीतील मार्केटिंग विभागात कनिष्ठ अधिकारी म्हणून असलेले श्री. विजय गोपीनाथ फाटक आणि त्यांचे ज्येष्ठ बंधू श्री. सुनिल फाटक आणि श्री. प्रभाकर फाटक हे तिघेजण अनेक वर्षांपासून त्यांच्या घरातील गणपतीसाठी प्रतिवर्षी नवीन कल्पनेतून आकर्षक सजावट करीत असतात. यासाठी तिघेही बंधू त्यांचे कुटुंबीयांसह विशेष परिश्रम घेऊन त्यांची कला



सजावटीमधून साकारीत असतात. या वर्षीही फाटक बंधूंनी नावीन्यपूर्ण कल्पकतेतून विविध कंपन्यांच्या बिस्किट पुड्यांची आकर्षक रचना करून गणपतीची सजावट केली होती. सदर सजवटीसाठी वापरण्यात आलेले बिस्कीटपुडे श्री गणेश विसर्जनानंतर वाघोली येथील आश्रमशाळेतील ४०० अनाथ मुलांना खाऊ म्हणून वाटप करण्यात आले. या वेगळ्या स्वरूपाच्या आणि प्रेरक कल्पनेची दै. सकाळ टाइम्स या वृत्तपत्राच्या इंग्रजी आवृत्तीने योग्य ती दखल घेऊन त्याचे विशेष बातमीत संकलन करून त्यास प्रसिद्ध केले आहे. सदर वृत्तपत्रास मुलाखत देताना श्री. विजय फाटक यांनी व्यक्त केलेल्या भावना अतिशय उद्बोधक अशा आहेत. त्यानुसार प्रतिवर्षी घरगुती गणपतीच्या सजावटीसाठी थर्मोकोल, फुले इत्यादीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यासाठी होणाऱ्या खर्च रकमेचा विनियोग समाजातील वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा घटकांसाठी केल्यास त्याचा योग्य कारणासाठी उपयोग होईल, असा वेगळा विचार मांडला. याप्रमाणे प्रत्येकाने घरगुती गणेश उत्सवात सजावटीसाठी होणाऱ्या खर्चरकमेचा विनियोग समाजोपयोगी कार्यासाठी केल्यास लोकमान्य टिळकांनी अपेक्षित केलेला गणेशोत्सव सार्थ होईल.

# Value Added Services (VAS) on ATM

आपली बँक वेळोवेळी तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक सेवा ग्राहकांना देण्यास नेहमीच सुसज्ज असते. ए.टी.एम. सुविधा ही त्यापैकीच एक आहे. सध्याच्या धावपळीच्या युगामध्ये पूर्वीप्रमाणे बँकेच्या वेळेमध्ये जाऊन व्यवहार करणे कठीण झाले आहे. परंतु अशा बाबतीत आधुनिक तंत्रज्ञान ग्राहकांच्या मदतीला धावून आले आहे असे दिसते.

आपल्या बँकेच्या ए.टी.एम. वर आपण Balance Inquiry, Cash Withdrawal, PIN Change, Mini Statement, Fund Transfer (एकाच ए.टी.एम.कार्डला लिंक असणाऱ्या खात्यामध्ये) या सुविधा देत आहोत व त्यास ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. उपरोक्त नमूद केलेल्या सेवांपैकी Fund Transfer ही सुविधा वगळता अन्य सर्व सेवा अन्य बँकेच्या खातेदारांसाठीदेखील उपलब्ध आहेत. आपली बँक NPCI-NFS ची सभासद असल्यामुळे आपले ग्राहक अन्य बँकेच्या ए.टी.एम. मधे तसेच अन्य बँकांचे खातेदार आपल्या बँकेच्या ए.टी.एम. मधे उपरोक्त सेवांचा लाभ घेऊ शकतात.

यापुढील प्रगतीचे पाऊल बँकेने उचलले असून नजीकच्या काळामध्ये आणखी पाच सुविधा नव्याने सुरु करीत आहोत.

१) Card to Card Fund Transfer – gXa सुविधेचा उपयोग करुन खातेदार आपल्या बँकेच्या कोणत्याही शाखेमधील खात्यामध्ये तसेच NTCI ची सभासद असणाऱ्या कोणत्याही बँकेच्या कोणत्याही शाखेमधील खात्यामध्ये रक्कम ट्रान्सफर करु शकतो. यासाठी वेळेची मर्यादा राहणार नाही. फक्त ज्या व्यक्तीस रक्कम ट्रान्सफर करावयाची आहे त्याचा डेबिट कार्ड क्रमांक माहिती असणे आवश्यक आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वानुसार या व्यवहारासाठी एक वेळेच्या व्यवहारासाठी जास्तीत जास्त रु. ५०००/- तसेच एकूण मिळून रु. २५०००/- एवढी मासिक मर्यादा निश्चित केलेली आहे.

२) Aadhar Number Updation – खातेदारास त्याच्या आधार क्रमांकाची नोंद बँकेमध्ये करावयाची असल्यास या सुविधेचा वापर करता येईल. आधार क्रमांकाची आवश्यकता वेगळी नमूद करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे आधार क्रमांक नोंदणीची विनंती खातेदार आता ए.टी.एम. वरुन करु शकेल.

३) Mobile Number Updation – मोबाईल ही आज सर्वांची गरज बनली आहे. आपण आपल्या खातेदारांना त्यांच्या खात्यावर होणाऱ्या सर्व व्यवहारांचे SMS पाठवीत असतो. खातेदारास त्याच्या मोबाईल क्रमांकाची नव्याने नोंदणी अथवा नवीन क्रमांकाची पुनर्नोंदणी ए.टी. एम. वरुन करता येईल. खात्यावरील व्यवहारांची तसेच बँकेच्या नवीन योजनांबद्दल माहिती होण्यासाठी मोबाईल क्रमांक बँकेकडे नोंदीत असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सदर सुविधा महत्वपूर्ण आहे.

४) Cheque Book Request–खात्यावरील व्यवहार सोयीने करता यावेत म्हणून आपण खातेदारास चेक बुक सुविधा उपलब्ध करुन



दिलेली आहे. चेक बुक संपल्यावर खातेदारास त्याची नोंदणी करण्यासाठी आता बँकेमध्ये येण्याची आवश्यकता नाही. 24x7x365 कोणत्याही वेळेत ए.टी.एम. सेंटरमध्ये जाऊन चेकबुकची विनंती नोंदवता येईल. त्याचप्रमाणे चेकबुक तयार झाल्याबाबतचे SMS आपण अगोदरपासूनच खातेदारास पाठवीत आहोत. त्यामुळे खातेदारास त्याबाबत देखील माहिती तातडीने कळेल.

५) Statement Request– खात्याचे स्टेटमेंट हवे असल्यास आता त्याची नोंदणीदेखील ए.टी.एम. वरुन करता येईल. खातेदाराने स्टेटमेंट मागणीची विनंती ए.टी.एम. वरुन केल्यास त्यास बँकेने ठरविलेल्या कालावधीचे स्टेटमेंट त्याच्या रजिस्टर्ड इमेलवर पाठवता येईल.

उपरोक्त सर्व सुविधा खातेदारांना विनासायास वापरता याव्यात यासाठी आवश्यक असणारे सर्व टेस्टींग बँकेने पूर्ण केलेले आहे. नजीकच्या काळात लवकरच या सर्व सुविधा आपण ए.टी.एम. वर उपलब्ध करुन देत आहोत.

**श्री. अभिजीत जोशी**
**कनिष्ठ अधिकारी, डेटा सेंटर**

## जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन अध्यक्षपदी विजय निल्दावार

जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशनची नुकतीच निवडणूक झाली. बिनविरोध झालेल्या निवडणुकीनंतर गठीत झालेली नवीन कार्यकारिणी खालीप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. विजय अनंत निल्दावार | अध्यक्ष | ९७३००१५०५८ |
| २) श्री. रवींद्र सदाशिव धुमाळ | सरचिटणीस | ९४०४४२१८८२ |
| ३) श्री. चंद्रकांत बाळू माने | उपाध्यक्ष (कोकण विभाग) | ९४२२५०११९९ |
| ४) श्री. शैलेश चंद्रकांत घोसाळकर | उपाध्यक्ष (मुंबई विभाग) | ९५०३०५००४३ |
| ५) श्री. मनोज बबन लोखंडे | कोषाध्यक्ष | ९५०३०३४१७५ |
| ६) श्री. श्रीकांत रघुनाथ म्हेत्रे | संघटक | ७७०९०४८०८६ |
| ७) श्री. शिवाजी जगन्नाथ वहाडणे | सदस्य | ९८९०६३८१५९ |
| ८) श्री. प्रसाद अरविंद पोटभरे | सदस्य | ९८५०१४५६१४ |
| ९) श्री. रूपेश गिरीश नाईक | सदस्य | ९९७००४२१५१ |
| १०) सौ. सुखदा सचिन कुलकर्णी | सदस्य | ९८५०५५५८५१ |
| ११) श्री. सुरेंद्र मुरलीधर थिटे | सदस्य (पुणे जि. विभाग) | ९७६२२६१९७३ |
| १२) श्री. गजानन रत्नाकर कुलकर्णी | सदस्य (मराठवाडा विभाग) | ९९६०५००२४२ |
| १३) श्री. सुनिल विठ्ठल माने | शिपाई प्रतिनिधी | ९३२५५३९९४४ |

## कर्वे रोड शाखा व माय विंग्ज होंडा शोरूम यांच्या संयुक्त विद्यमाने वृत्तपत्र विक्रेत्यांना 'ॲक्टिव्हा ३ जी' दुचाकी भेट



गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून पुणे वृत्तपत्र विक्रेता संघ, नळस्टॉप विभाग, जनता सहकारी बँक, कर्वे रोड शाखा व माय विंग्ज होंडा शोरूम, पौड रोड यांच्या संयुक्त विद्यमाने वृत्तपत्र विक्रेत्यांना 'ॲक्टिव्हा ३ जी' दुचाकी भेट देण्यात आल्या. या वेळी प्रवचनकार चंद्रकांत महाराज वांजळे, संघटनेचे अध्यक्ष विजय पारगे, नगरसेवक प्रशांत बधे, बँकेचे शाखा व्यवस्थापक रमाकांत बुवा आदी उपस्थित होते.

### Knowledge Page

बँकेत नव्याने रुजू झालेला एक लेखनिक फार मनापासून व भरपूर काम करत असल्याने सहाजिकच कायम झाला. त्याच्या कामाचे वर्णन वरिष्ठानी He sank his teeth into work असे केले.

**म्हणजे प्रचंड उत्साहात व ऊर्जेने कार्यरत असणे.**

**– अभय शरद बापट**

## खातेदार व सभासद विवेक भोपटकर यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार प्रदान

देवरुख शाखेचे जुने खातेदार व सभासद श्री विवेक श्रीराम भोपटकर हे देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे 'आठल्ये सप्रे पित्रे' महाविद्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून सेवेत आहेत. त्यांना दि. २६/१/२०१६ रोजी मुंबई विद्यापीठातर्फे देण्यात येणारा 'मुंबई विद्यापीठ गुणवंत कर्मचारी' हा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी असलेला मानाचा पुरस्कार (सन २०१४/२०१५ साठीचा) मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू श्री. संजय देशमुख यांचे हस्ते कलिना येथे प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप रु. ५०००/– रोख, भेट वस्तू व प्रशस्तिपत्रक असे आहे. समाजातील सर्व स्तरांवरून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे 'आठल्ये सप्रे पित्रे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया'ला केंद्र सरकारच्या (NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL) 'न्याक' संस्थेतर्फे दर ५ वर्षांनी दिल्या जाणाऱ्या मानांकनात मार्च २०१६ साठी 'अ' दर्जा देण्यात आला आहे. त्या साठी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली होती. सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ हे देवरुख शाखेच्या स्थापनेपासून बँकेशी विविध प्रकारे जोडले गेले आहे.

## वाचकांना नम्र आवाहन

गरुड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. **पत्ता : श्री. राजन कोळपकर, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे., मो. क्र. : ९९६०१२३३३१ गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ✲ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.

दूरध्वनी : ०२०–२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)

३०.०९.२०१६